**<u>मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज क्र.४७६/२०१८ मधील निशाणी ५ खालील आदेश.</u>**

१. सदर अर्जाद्वारे मयत श्री.मिथुन प्रकाश साळोखे यांचे अपघाती मृत्यूबाबत त्याचे कायदेशीर वारस पत्नी व मुलांनी मोटार वाहन अधिनियम कलम १४० अन्वये रुपये ५०,०००/– अंतरिम नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे.

२. अर्जदारांच्या कथनाप्रमाणे अपघाताच्या वेळी व दिवशी सदर अपघातग्रस्त टाटा झेक्ट क्र. एमएच–१३/सीयु–०१८५ चा वि.प.क्र.१ हा मालक होताव वि.प.क्र.२ हा चालक होता. तसेच अपघातसमयी सदर वाहन वि.प.क्र. ३ विमाकंपनीकडे विम्याने संरक्षित होते. त्यामुळे ते तिघेही अर्जदारांना संयुक्तिक व वैयक्तिकरित्या नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. वि.प.क्र.४ व ५ हे मयताचे आई वडील असून त्यांना सदर कामी औपचारीक पक्षकार म्हणून दाखल केले आहे.

३. सदर अर्जाचे कामी वि.प.क्र.१ व २ हे या कामी गैरहजर राहिल्याने त्याचे विरुध्द सदरचा अर्ज एकतर्फा चालण्याचा आदेश पारीत करणेत आला.

४. सदर अर्जाचे कामी वि.प.क्र.३ हे या कामी हजर होऊन देखील त्यांनी आपली कैफियत दाखल न केल्यामुळे त्यांचेविरुध्द सदरचा अर्ज 'विना कैफियत' चालविण्याचा आदेश पारीत करणेत आला आहे.

५. अर्जदाराने सदर घटनेबाबत नोंदविण्यात आलेल्या गुन्हयातील पोलीस तपासाची कागदपत्रे म्हणजेच फिर्यादी जबाब, प्रथम खबरी अहवाल, घटनास्थळ पंचनामा, दोषारोपपत्र, मरणोत्तर पंचनामा, शवविच्छेदन अहवाल व अपघातग्रस्त टाटा झेक्ट क्र. एमएच–१३/सीयु–०१८५ या वाहनाचे नोंदणीपत्र व विमापत्र इ. दाखल केलेले आहेत. या कागदपत्रांवरुन अपघातग्रस्त टाटा झेक्ट क्र. एमएच–१३/सीयु–०१८५ हे वाहन अपघातात सकृत दर्शनी सामिल होते व अपघाता दिवशी सदरचे वाहन विम्याने संरक्षित होते. तसेच सदर अपघातात मयत

मिथुन प्रकाश साळोखे याचा हात तुटून डोक्याला गंभीर इजा झाल्यामुळे तो मयत झाला आहे असे दिसून येते.

६. सबब, वि.प. यांनी उपस्थित केलेले वरील सर्व मुद्दे हे मोटार वाहन अधिनियमाच्या कलम १४०च्या अर्जाच्या वेळेस विचारात घेणे न्यायाधिकरणाला अपेक्षित नाही. अशा परिस्थितीत वादकथन व जबाब, तसेच अभिलेखावरील कागदपत्रे पाहता अर्जदारांने ते मोटार वाहन अधिनियमाचे कलम १४० अन्वये नुकसान भरपाई मिळण्यास पात्र असल्याचे शाबीत केलेले आहे.

७. वरील बाबींचा ऊहापोह करुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प. क्रमांक १ ते ३ हे स्वतंत्ररित्या व संयुक्तीकरित्या अंतरिम नुकसान भरपाई रक्कम रुपये ५०,०००/– (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) अर्जदारास देण्यास जबाबदार आहेत.

३) वि.प.क्रमांक १ ते ३ यांनी सदरची नुकसान भरपाईची रक्कम अर्जदार क्र. १ ते ३ व वि.प. क्र.४ व ५ यांना प्रत्येकी रुपये १०,०००/– प्रमाणे त्याचे नावाने स्वतंत्र रेखांकित धनादेशाद्वारे सदरहू न्यायाधीकरणामार्फत आजपासून दोन महिन्याचे आत द्यावी.

४) वरीलप्रमाणे रक्कम दोन महिन्यांच्या आत न दिलेस त्यावर द.सा.द.शे. ७% दराने व्याज मिळणेस अर्जदार पात्र राहील.

५) वरीलप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

Sd/–

दिनांक: ०३/०४/२०१९.          ( **श्रीमती आर.एस.निंबाळकर** )

सदस्य, मोटार अपघात न्यायाधीकरण,कोल्हापूर.